**नाशिक महानगरपालिका ,नाशिक**

**कामगार कल्याण विभाग**

**ई कोटेशन नोटीस सुचना ( सन २०२३ -२४)**

**कामाचे नाव :- सेवानिवृत्ती सत्कार प्रसंगी लागणा-या उतम दर्जाच्या वस्तु व सेवा पुरविणे बाबत.**

**माहे** एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधी मध्ये नाशिक महानगरपालिकेतील कायम सेवेत असलेले विविध संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांचे **सेवानिवृत्ती सत्कार प्रसंगी** लागणा-या उत्तम दर्जाच्या वस्तु व सेवा पुरविणे कामी मुळ उत्पादक, उत्पादनाचे अधिकृत वितरक, विक्रेते यांचेकडुन कोटेशन पध्दतीने खालील प्रमाणे वस्तुं पुरविणे करीता सर्व कारांसह कोटेशन व्दारे दर मागविण्यात येत आहे .

| अ.न. | तपशिल | वर्णन | मागणी नग संख्या |
|---|---|---|---|
| १) | स्मृतीचिन्ह | लाकडी बेस व काचेच्या बॉक्स सह ८×१० इंच नामनपाचे बोधचिन्ह असलेले,गोल्डन अक्षरे, मा. आयुक्त, उपआयुक्त व इतर अधिकारी/पदाधिकारी यांचे नावांसहित | २५० |
| २) | शॉल | मध्यम दर्जा,मोठी साईज 4 फूट रूंद 6 फूट लांब, आकर्षक रंग,प्युवर वुलन, | २५० |
| ३) | श्रीफळ | मोठे,पाणीदार | २५० |
| ४) | वृक्ष रोपे प्लास्टिक कुंडीसह | वेगवेगळया प्रकारची शोभेचे /फुलांचे किंवा वृक्षांचे रोपे. | २५० |
| ५) | चहा व पिण्याचे पाणी | चहा व पिण्याचे पाणी | सत्कारार्थी व त्यांचे समवेत आलेले कुटुंबातील व्यक्ती समारंभास आलेले पाहुणे, अधिकारी,पदाधिकारी तसेचे अधिकारी/कर्मचारीयांचेकरीता गरजेनुसार संपुर्ण वर्षाचे अंदाजे (१२५०) व्यक्ती |
| ६) | फोटो | | २५० |
| | | **एकुण खर्च** | **२,८०,०००/-** |

**अटीशर्ती**

१. वरील कामाचे कोटेशन पत्रक अटीशर्ती सह www.nmc.gov.in या संकेत स्थळावर दिनांक. / /२०२३ ते दिनांक / /२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजेपावेतो उपलब्ध आहे.
२. कोटेशन पाकिट सादर करणेची अंतिम तारीख दि. / /२०२३ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त होणारी कोटेशन पाकीटे स्विकारली जाणार नाही.
३. कोटेशन पाकीट कामगार कल्याण विभाग राजीव गांधी भवन शरणपुर रोड नाशिक-२ येथे स्विकारण्यात येतील.
४. सदर सदरच्या कामाकरीता वेगळा वाहतूक खर्च देण्यात येणार नाही.
५. सदरचे दरपत्रक हे सर्व करासह अनुषंगीक खर्चासह दर नमुद करायचे आहे. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.
६. कोटेशन धारकाने दोन लिफाफे देणे आवश्यक आहे.१) तांत्रिक लिफाफा कोटेशन धारक /एजन्सी हि नाशिक मनपा हद्दीतील स्थायिक असणे आवश्यक आहे.कोटेशन सोबत पॅनकार्ड, शॉप ॲक्ट लायसन्स, GST नोंदणी प्रमाणपत्र, अनुभवाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.त्या शिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही.
७. अतांत्रीक लिफाफा---- दर पत्रक आवश्यक
८. कोटेशन धारकास कमीत कमी र.रु. १५०००/- (प्राकलनाच्या एकूण रक्कमेच्या ) ५% सुरक्षा अनामत भरावी लागेल त्या शिवाय कोटेशन सादर करता येणार नाही.
९. कोटेशन स्विकारणे / नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

**उप आयुक्त (समाज कल्याण)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## कामगार कल्याण विभाग
## ई कोटेशन सुचना( सन २०२३- २४)

**कामाचे नाव— सेवा निवृत्ती सत्कार प्रसंगी लागणा-या उत्त्म दर्जाच्या वस्तू व सेवा पुरविणे बाबत.**

## सर्व साधारण अटी—शर्ती

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही . सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद कामाचे स्वरुप हे अंदाजे असुन त्यामध्ये कामाचे अनुषंगाने कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव काम पुर्ण करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील .

४) ज्यांचे कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र. रु. ५२०/- चे जनरल स्टँपपेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल . तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल .

५) जी.एस.टी करासह व अनुषंगीक खर्चासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

६) मुदतीत काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा केलेल्या कामावर/ सेवा पुरविण्याच्या रकमेवर दर हजारी दर दिवसाला र. रु १ याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार कामकरणे/सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

८) मुदतीत काम न झाल्यास/ /सेवा न पुरविल्यास /मुदतीत काम पुर्ण न केल्यास,सदरचे काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

९) मंजुरीनुसार काम न झाल्यास / सेवा न पुरविल्यास,काम/ सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील .

१०) कोणतेही काम मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही . याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही.

११) अटी /शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी- घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

१२) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या कामाच्या दरात/सेवेच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही .

१३) अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१४) काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

१५) मा.शासनाचे गर्व्हमेंट ई मार्केटप्लस पोर्टलवर सदरचे बाबीचे दर उपलब्ध असलेस आणि गुणवत्ते बाबत साम्य असलेस अशा बाबत (GeM) वरील दराशी तुलना करणेत येईल. पोर्टलवरील दरापेक्षा कोटेशन दर कमी असलेस असे दर मंजुर करणे बाबत विचार करणेत येईल अन्यथा (GeM) वरील दराने काम करणे बाबतचा अधिकार राखुन ठेवणेत येत आहे.

१६) ---. सेल टॅक्स प्रमाणपत्र,संस्था रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र,कामाचा अनुभवाचा दाखला,पॅन कार्ड, संस्थेचे बँक खाते, जीएसटी रजिष्ट्रेशन प्रमाणपत्र इ. कागद पत्रे साक्षंकित करुन जमा करणे आवश्यक राहील.

प्र.उप आयुक्त (समाजकल्याण)
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का